# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### कबनूर( जि.कोल्हापूर) येथे नगरपरिषद स्थापन करण्याबाबत

**(१) १९८४ (२३-१२-२०१४). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कबनूर (जि.कोल्हापूर) येथे नगरपरिषद स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येत असून त्यासाठी प्रस्ताव सादर करण्याबाबत दिनांक १४ जुलै, २०११ रोजीच्या पत्राद्वारे जिल्हाधिकारी कोल्हापूर यांना मा.नगरविकास मंत्री यांनी कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कबनूर येथे नगरपरिषद स्थापन करणेचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्यामार्फत विहीत मार्गाने शासनास सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कबनूर येथे नगरपरिषद स्थापन करणेबाबत प्रस्तावावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२) व (३) याबाबत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे कडून अहवाल प्राप्त करुन घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चिपळूण (जि.रत्नागिरी) शहरातील कोळकेवाडी धरणातून ग्रॅव्हीटीद्वारे पाणी पुरवठा योजनाबाबत

**(२) ३१७६ (२३-१२-२०१४). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) शहरातील कोळकेवाडी धरणातून ग्रॅव्हीटीद्वारे पाणी पुरवठा योजना प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोळकेवाडी धरणातून ग्रॅव्हीटीद्वारे पाणी योजना होणे शक्य असून अशाप्रकारे योजना झाल्यास पंपासाठी लागणाऱ्या वीजेची बचत होऊन संपूर्ण शहराला शुध्द पाणी मिळणे शक्य आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावील पाणी योजनेची सद्य:स्थिती काय आहे,

(४) योजनेच्या मंजूरीची कार्यवाही झालेली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६)** :(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) चिपळूण नगरपरिषदेने कोळकेवाडी धरणातून ग्रॅव्हीटीने पाणी पुरवठा करणे या योजनकरिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांची नियुक्ती केलेली असून सन २०१६-१७ ची दरसूचीनुसार सुधारित प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांचेकडे सादर करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्हयातील उजनी धरणात मुबलक पाणीसाठा उपलब्ध असताना ही शहरात तीन दिवसाआड पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(३) ४१८० (२३-१२-२०१४). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील उजनी धरणात मुबलक पाणीसाठा उपलब्ध असताना महानगरपालिकेच्या गलथानपणामुळे दहा लाख लोकसंख्या असलेल्या शहरात तीन दिवसाआड पाणीपुरवठा होत असल्याची माहे सप्टेंबर, २०१४ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाकडून चौकशी करण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती कोणती उपाय योजना करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६)** :(१) व (२) होय, हे खरे आहे.

सोलापूर शहर पाणीपुरवठ्याकरीता उपलब्ध असलेले उजनी धरण, भिमानदी टाकळी व एकरुख तलाव यापैकी माहे मे २०१४ च्या सुमारास एकरुख तलावातील पाण्यात खूप मोठ्या प्रमाणात घट झाल्याने येथील पाणी सोलापूर शहरासाठीच्या जॅकवेलच्या इनटेक चॅनेल पेक्षा खाली गेल्याने, सदरची योजना बंद पडली.

सदर ठिकाणी तलावालगत इलेक्ट्रीक पंप बसवून पाण्याचा उपसा करणेत येत आहे. सदर उद्भवातून सध्या ३ ते ४ द.ल.लि. पाणी इतकेच उपलब्ध होत आले. माहे मे २०१४ च्या दरम्यान UIDSSMT योजनेअंतर्गत सुमारे १२० कि.मी. व महानगरपालिका फंडातील सुमारे २० कि.मी. डस्ट्रीब्युशन पाईप लाईन कार्यान्वित केलेली आहे व नव्याने ५ टाक्या वापरात घेण्यात आलेल्या आहेत. उन्हाळ्यामुळे पाण्याची वाढती मागणी लक्षात घेता स्त्रोतातील पाणी

कमी असल्याने व भिमा नदी (टाकळी) योजना व एकरुख तलाव योजना जुन्या झाल्या असून पूर्ण क्षमतेने चालवू शकत नसल्याने तसेच जादा पाण्याचा उपसा करता येत नसल्याने माहे मे, २०१४ पासून शहराचा पाणी पुरवठा तीन दिवसाआड करण्यात आला.
(३) पुढील ३० वर्षाची वाढीव लोकसंख्या गृहीत धरुन महापालिकेने वाढीव पुरवठा व शहरात २४*७ पाणी पुरवठा करणेच्या अनुषंगाने तज्ञ कन्स्लटंट नेमून संपूर्ण पाणी पुरवठ्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे.

यात्यतिरिक्त तातडीने पाणी पुरवठा सुधारणा करणेच्या दृष्टीने महानगरपालिकेकडून भीमा टाकळी पाणी पुरवठा योजने अंतर्गत नांदणी येथे नविन BPT बांधण्याचे काम हाती घेतलेले आहे. तसेच सोरेगाव जलशुध्दीकरण केंद्रातील फिल्टर बेड बदलणे इ. कामाच्या निविदा मंजूरीची कार्यवाही चालू असून साधारण २ महिन्यात कार्यान्वित होणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचे योग्यप्रकारे नियोजन करण्याबाबत**

**(४) ५६७९ (०६-०४-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचे योग्यप्रकारे नियोजन केले जात नसल्याने कोट्यवधी रुपये खर्च करुनही प्रश्न सुटत नसल्याचे मत पर्यावरण संवर्धनासाठी आयोजित केलेल्या परिसंवादात तज्ञांनी मत मांडल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील कचऱ्याची समस्या सोडविण्यासाठी शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) राज्यातील कचऱ्याची समस्या सोडविण्यासाठी तसेच शहरांमधील नागरीकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे या करिता नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २००० नुसार सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रत्येक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने घनकचरा व्यवस्थापन आराखडा तयार करावयाचा आहे. शहरात निर्माण होणारा १००% कचरा निर्मितीच्या जागीच वेगवेगळा करुन स्वतंत्रपणे संकलित करणे, या संकलित केलेल्या (ओला व सुका) १००% कचऱ्याची वाहतूक करणे, ओल्या कचऱ्यावर केंद्रीत अथवा विकेंद्रित पध्दतीने जागीच प्रक्रिया करणे, तर, सुक्या कचऱ्याचे पुनर्वापराकरिता पुन्हा विलगीकरण करुन त्यावर प्रक्रिया करणे व उर्वरित कचऱ्याची शास्त्रीय पध्दतीने विकसीत केलेल्या भरावभूमीवर विल्हेवाट लावणे अपेक्षित आहे.

राज्यातील शहरात उपरोक्त प्रमाणे अंमलबजावणी करण्याकरिता स्वच्छ भारत अभियानांतर्गत ८ शहरांचे रुपये ४४७.३७ कोटी किंमतीचे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. यासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत एकूण रुपये ७०.७१६६ कोटीचे पहिल्या हप्त्याचे अनुदान ही वितरीत करण्यात आले आहे. यया अभियानांतर्गत राज्यातील उर्वरित सर्व शहरात घनकचरा व्यवस्थापनाचे प्रकल्प राबविण्याचे नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हा-खंडाळा राजमाची रोप वे प्रकल्पासाठीच्या जागेचा सातबारा नगर परिषदेच्या नावे करण्याबाबत**

**(५) १५४४५ (०७-०४-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा-खंडाळा राजमाची रोप वे प्रकल्प लोणावळा नगर परिषदेने २००५ मध्ये करण्याचा ठरावा केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासाठी कुणेगाव येथील शासनाची साडेबारा हेक्टर जागेसाठी नगर परिषदेने ४ कोटी ९६ लाख रुपये शासनाकडे जमा केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) नगर परिषदेने तीन महिन्यापुर्वी शासनाकडे व्याजाच्या रकमेपोटी २ कोटी २५ लाख रुपये भरले तरीदेखील सातबारा नगर परिषदेच्या नावे करण्यास शासनाच्या महसूल विभागाकडून दूर्लक्ष होत असल्याने हा प्रकल्प अद्यापही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकल्पाच्या जागेचा सातबारा नगर परिषदेच्या नावे करणेबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर येथील पाणी टंचाईवर मात करण्यासाठी उजनी नदीच्या पाण्याचे नियोजन करण्याबाबत**

**(६) १६५५० (१७-०८-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर येथील औज बंधाऱ्यातील पाणीसाठा संपुष्टात आला आहे. त्यामुळे शहरात पाणी टंचाई वाढली आहे. पाच दिवसानंतर पाणी पुरवठा होऊ लागल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. शहरी भागातील काही भागास व्यवस्थित पाणीपुरवठा होतो परंतु हद्दवाढ भागात पाणीपुरवठा होत नसल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील उजनी नदीच्या पाण्याचे नियोजन केल्यास तीन दिवसात शहरात पाणी फिरु शकते असे तज्ञ सांगत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील पाणी टंचाईवर मात करण्यासाठी उजनी नदीच्या पाण्याचे नियोजन करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१६) :** (१) माहे मे, २०१५ मध्ये उजनी धरण पूर्ण क्षमतेने भरलेले नसल्याने तसेच एकरुख तलावातील पाणी प्रमाणात घट झाल्याने पाणी पुरवठ्यात अडचणी होत्या हे खरे आहे.

(२) सोलापूर शहराचा पाणी पुरवठा फक्त उजनी पाईप लाईनवरुन करणे तांत्रिकदृष्ट्या शक्य नसल्याचे सोलापूर महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) अमृत अभियानांतर्गत सोलापूर पाणी पुरवठा सुधारणा योजनेसाठी रु. ७१५१.३९ लक्ष रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) येथील ग्रामीण परिसरात**
**बेकायदा बांधकामे वाढत असल्याबाबत**

**(७) १७५९९ (१७-०८-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) येथील ग्रामीण परिसरात बेकायदा बांधकामे वाढत असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये ग्रामीण भागातील गांवाचा महापालिकेत समावेश, त्यानंतर महापालिकेतून बाहेर जाण्याचे प्रयत्न, एमएमआरडीएकडे ग्रामीण भागातील पट्टाचा मिळालेला ताबा, विकास आराखड्याचा अंमलबजावणी झालेला विलंब यामुळे या भागातील सरकार, प्रशासकीय यंत्रणेच्या कारभाराबाबत नेहमीच गोधळाची स्थिती असते याचा फायदा घेत कल्याण डोंबिवली ग्रामीण भागात बेकायदा बांधकामे वाढत आहेत हे पाहता शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत २७ गावांच्या अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणुक झाल्यापासून महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वये एकुण ४७४ प्रकरणांमध्ये नोटीस बजावण्यात आल्या आहेत. तसेच ५९ अनधिकृत बांधकामाधारक /मालक/ विकासक यांच्यावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४३ सह ५२ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. एका

प्रकरणात निष्कासन कार्यवाही करण्यात आलेली आहे व ११९ अनधिकृत प्रकरणांमध्ये निष्कासनकामी पोलीस बंदोबस्त मिळण्यासाठी पत्रव्यवहार केलेला आहे. तसेच ३ प्रकरणी न्यायालयात दावे दाखल असून उर्वरित प्रकरणी कार्यवाही केली आहे.

शासनाने दि.३० एप्रिल, २०१६ च्या अधिसूचनेनुसार कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील २७ गावांच्या अधिसूचित क्षेत्रामधील मौ. भोपर (भाग), संदप, उसरघर (भाग), घारिवली (भाग), माणगांव (भाग), हेदुटणे (भाग), कोळे, काटई (भाग), निळजे (भाग) व घेसर (भाग) या गावांमधील सुमारे १०८९ हेक्टर या ग्रोथ सेंटरच्या क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक कायम ठेवून उर्वरित क्षेत्रासाठीची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची नेमणूक रद्द केली आहे. ग्रोथ सेंटरच्या क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामांवर प्राधिकरणामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदींनुसार कार्यवाही सुरु आहे.

---

**पनवेल (नगरपरिषद हद्दीत) येथे येणाऱ्या नविन औद्योगिक प्रकल्पांमुळे रोजगार व उद्योग धंद्यासाठी अनेक ठिकाणावरुन नागरीक स्थलांतरित होत असल्याबाबत**

**(८) २३६१५ (१०-०८-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (नगरपरिषद हद्दीत) येथे येणाऱ्या नविन औद्योगिक प्रकल्पांमुळे रोजगार व उद्योग धंद्यासाठी अनेक ठिकाणावरुन नागरीक स्थलांतरित होत असल्याने झोपड्यांचे प्रमाण वाढत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोक्याच्या जागेवर असलेल्या झोपड्यांचा वापर व्यावसायिक कारणासाठी करण्यात येत असून दिवसेंदिवस अशाप्रकारच्या दुकानांची संख्या वाढत चालली असून झोपडपट्टी पुनर्वसनाला अडथळा निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त झोपडपट्टींच्या पुनर्वसनासाठी नगरपरिषदेमार्फत सिडकोकडे वारंवार मागणी करुनही सिडकोकडून कोणतीही कार्यवाही केली जात नसल्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) याबाबत आयुक्त, तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचलनालय यांना सिडको व नगरपरिषद, पनवेल यांच्यासमवेत बैठक घेऊन आवश्यक कार्यवाही करावी अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मागसवर्गीय संवर्गातील कर्मचा-यांचा अनुशेषाबाबत**

**(९) २८२३६ (०५-११-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मागासवर्गीय संवर्गात अनुशेष असल्यास नोकर कपात अथवा पदोन्नती करताना कोणाही कर्मचाऱ्याला सेवामुक्त करता येणार नाही, असे शासनाचे आदेश आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागाने तब्बल १५ मागासवर्गीय शिक्षण सेवकांना नोकरीतून थेट कमी केले असल्यामुळे सदर शिक्षण सेवकांची महापालिका आयुक्तांकडे इच्छा मरणाची परवानगी दिनांक १० ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास मागितली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तसेच पालिकेच्या प्राथिमक अनुदानित विभागात २५७ शिक्षक अतिरिक्त ठरविण्यात आले असून त्यात २५ हून अधिक शिक्षण सेवक व शिक्षकांना सेवामुक्त करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाचे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.

शासन निर्णय क्र. ४९०/४६, दिनांक २ एप्रिल, १९५३ मधील निदेशानुसार, नोकरकपात करावयाची असले तेव्हा जे पूर्वीचे सेवेत आहेत अशा मागासवर्गीय उमेदवारांना त्यांच्या वरिष्ठतेनुसार नोकरीतून काढता येत असेल तरीही कोणत्याही विश्टि कार्यालयातील अथवा विभागातील वर्ग तीन व वर्ग चार या संवर्गातील त्यांच्या संख्या ठरवून दिलेल्या राखीव पदांच्या टक्केवारीपेक्षा जास्त होत नसेल तर, त्यांना नोकरीतून काढण्यात येऊ नये.

त्यांच्याऐवजी, तेवढेच इतर (म्हणजेच मार्गासवर्गीयेतर उमेदवार) कर्मचारी नोकरीतून काढून टाकता येतील.

तथापि, स्थायी आणि अस्थायी शासकीय कर्मचाऱ्यापैकी अस्थायी शासकीय कर्मचाऱ्यास, मग तो मागासवर्गीय असला तरीही, त्याला नोकरीतून कमी करता येईल.

(२) हे खरे नाही.

ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यासुमारास महापालिकेच्या शिक्षण विभागाने कोणत्याही खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षण विभागाची मान्यता असलेल्या शिक्षण सेवकांना कमी केले असल्याची बाब निदर्शनास आलेले नाही.

(३) व (४) सन २०१४-१५ व २०१५-१६ मध्ये अतिरिक्त कर्मचाऱ्यांना अतिरिक्त ठरविण्याबाबत न्यायालयाची स्थगिती असल्यामुळे महापालिका क्षेत्रातील खाजगी प्राथमिक अनुदानित शाळांतील कोणत्याही सहाय्यक शिक्षक अथवा शिक्षण सेवकांना अतिरिक्त ठरविण्यात आलेले नव्हते अथवा त्यांच्या सेवाही समाप्त करण्यात आलेल्या नाहीत.

खाजगी अनुदानित शाळांतील अतिरिक्त ठरणाऱ्या सहाय्यक शिक्षकांना इतर शाळांमध्ये रिक्त जागांवर समायोजन करण्यात यावे या दिनांक ०८.१२.२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार महापालिकेमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच अतिरिक्त ठरणाऱ्या कोणत्याही शिक्षकाला महापालिकेमार्फत कमी करण्यात आलेले नाही.

---

**सिंधुदूर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी येथील मच्छि मार्केटचे काम मंदगतीने सुरु असल्याबाबत**

**(१०) २९५८५ (२३-१२-२०१५). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी येथील मच्छि मार्केटचे काम मंदगतीने सुरु असून सदर कामास दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर मस्यकी योजनेतील मच्छिमार्केटचे काम तातडीने पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१), (२) व (३) मच्छिमार्केटच्या इमारतीच्या बांधकामाकरीता कत्रांटदारास दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली होती, हे खरे आहे. तथापि, सदर काम दि. २०.०५.२०१६ रोजी पूर्ण केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील जागतिक किर्तीच्या दीक्षाभूमिला 'अ' श्रेणीचा दर्जा देण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(११) ३०४६८ (१६-०१-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील जागतिक किर्तीच्या दीक्षाभूमिला 'अ' श्रेणीचा दर्जा देण्याचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती नागपूरच्या सदस्यांनी माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये जिल्हा बैठकीच्यावेळी मांडला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या कॅबिनेट समोर सादर करु असेही आश्वासन मा. उर्जा मंत्री तथा पालकमंत्री यांनी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रस्तावावर पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचे शासन निर्णय क्र.विकाक-२०१४/३/ प्र.क्र.२७२/पर्यटन, दि. ८ मार्च, २०१६ अन्वये नागपूर येथील जागतिक किर्तीच्या दिक्षाभूमीला “अ” वर्ग पर्यटन स्थळ म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे कोहोज खुंटवली (जि.ठाणे) येथील बांधकामास शासनाची रितसर रक्कम भरुन न घेताच अंबरनाथ नगरपालिकेने बांधकामास परवानगी दिल्याबाबत**

**(१२) ३०५०७ (२१-०१-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ नगरपालिका क्षेत्रातील मौजे कोहोज खुंटवली येथील न.भू.क ७८८९ ते ७८९३, ७८९५, ७८९७ ते ७९१२ ते ७९१६ या मिळकतीच्या बांधकामास शासनाची रितसर रक्कम भरुन न घेताच अंबरनाथ नगरपालिकेने बांधकामास परवानगी दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती ही बांधकाम परवानगी कधी व कोणत्या नियमान्वये देण्यात आली सर्व नियम डावलून आर्थिक गैरव्यवहार करुन बांधकाम परवानगी दिली असल्यास, संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१), (२) व (३) अंबरनाथ नगरपरिषदेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ४५ अन्वये दि. २०.१०.२०१४ रोजी नमूद मिळकती वरील बांधकाम परवानगी दिलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) पालिकेच्या ५ शाळा बंद करण्यात येणार असल्याबाबत**

**(१३) ३१२०१ (२३-१२-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील पालिकेच्या ५ शाळा विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी असल्याचे निमित्त पुढे करुन बंद करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला असून या शाळांचे दुस-या शाळेत

एकत्रीकरण करुन सकाळचे वर्ग रद्द करुन विद्यार्थ्यांना शिकविण्याची एकच वेळ सकाळी ११ ते सायं ५ अशी ठेवण्याचा शासनाने निर्णय घेतला असल्याचे दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाला मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी यांचा विरोध असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६)** :(१) उल्हासनगर महानगरपालिकेच्या ८ शाळा एकत्रित करुन त्यांचे विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी व प्रशासकीय सुसुत्रीकरणासाठी एकाच सत्रात सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत चालविण्यासाठी ४ शाळांमध्ये रुपांतरीत करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला होता हे खरे आहे.

(२), (३) व (४) सदर निर्णयाला मुख्याध्यापक व शिक्षक यांचा विरोध झाल्याने याबाबत महापौर, उल्हासनगर महानगरपालिका यांच्याकडे झालेल्या बैठकीत सदर निर्णय स्थगित करण्यात आलेला आहे.

---

**मावळ (जि.पुणे) येथील शंकरवाडीचा समावेश तळेगावमध्ये करणेबाबत**

**(१४) ३२९२० (२१-०१-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हातील मावळ तालुक्यात स्वातंत्र काळापासून घोरवडेश्वर मंदिराच्या पायथ्याशी असलेली शंकरवाडीत सुमारे अडीच हजार नागरीक रहात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शंकरवाडीचा समावेश नगरपरिषद, कॅन्टोन्मेंट बोर्ड व ग्रामपंचायतमध्ये समावेश नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शंकरवाडीचा व आजुबाजुच्या वाड्यांचा समावेश तळेगाव नगरपरिषदेमध्ये करुन येथील रहिवाशांचा महसुल तळेगावमध्ये जमा होतो असा ठराव नगरपरिषद, पंचायत समिती यांच्यात होऊन एक वर्ष झाले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनेक वर्षापासुन सुविधापासून वंचित असलेल्या शंकरवाडीचा तळेगाव दाभाडे नगरपरिषदमध्ये समावेश होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०९-२०१६)** :(१) व (२) सदर भागाचा समावेश स्थानिक स्वराज्य संस्थेत नाही. हे खरे आहे.

(३) व (४) सदर भागातील लोकांकडून नगरपरिषद कोणत्याही प्रकारचा कर महसूल /अधिभार वसूल करत नाही. सदर भागाचा समावेश नगरपालिका हद्दीत करण्याची बाब नगरपरिषदेच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद-वाळूज-सातारा येथे माऊलीनगर ते देवळाई परिसर**
**या रस्त्याच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(१५) ३३१६५ (१६-०१-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद - वाळूज - सातारा येथे माऊलीनगर ते देवळाई परिसर या रस्त्याचे डांबरीकरण अवघ्या सहा तासात पूर्ण करण्यात आले या रस्त्याचा मधला भाग तसाच ठेवून डांबरीकरण करण्यात आले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कामाची चौकशी करुन संबंधित ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.

सदरचे काम हे निविदेत दिलेल्या स्पेसिफिकेशनप्रमाणे करण्यात आलेले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर महापालिकेकडे केंद्र व राज्य शासनाकडून आलेल्या विविध**
**योजनांच्या निधी वापराविना पडून असल्याबाबत**

**(१६) ३५२७४ (२०-०१-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील पंचगंगा प्रदूषण, सुजल अभियान, दुधाळी व कसबा बावडा सांडपाणी प्रक्रिया केंद्र, थेट पाईपलाईन, नगरोत्थान रस्ते प्रकल्प, रंकाळा सुशोभिकरण, पावसाळी पाणी नियोजन आदी शहरातील कामासांठी सन २००८ पासून आजपर्यंत तब्बल ७३७ कोटी ९१ लाख रुपयांचा निधि प्राप्त होऊनही प्रत्यक्षात तीनशे कोटी रुपयांचा निधीही खर्च करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त प्रकल्प पूर्ण करण्याकरीता कोटयवधी रुपयांचा मोबदलाही कंपन्यांना दिला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महापालिकेकडे केंद्र व राज्य शासनाकडून आलेल्या विविध योजनांचा निधी वापराविना पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्प प्रलंबित असल्यामुळे विकासावर त्याचा परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या सदंर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६)** :(१) कोल्हापूर शहरातील पंचगंगा प्रदूषण, महाराष्ट्र सुजल निर्मल अभियानांअंतर्गत पाणी पुरवठा योजना, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अंतर्गत सांडपाणी प्रक्रिया केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी अंतर्गत थेट पाईपलाईन योजना, राष्ट्रीय सरोवर सवंर्धन अंतर्गत रंकाळा तलाव संवर्धन, महाराष्ट्र सुवण जयंती नगरोत्थान अंतर्गत रस्ते प्रकल्प व पावसाळी पाणी नियोजन या सात प्रकल्पांसाठी आतापर्यंत रु. ३४७.७७ कोटी निधी कोल्हापूर महानगरपालिकेस वितरीत करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही. तथापि, स्विकृत निविदेनुसार काम पूर्ण केलेचे प्रमाणात केलेल्या कामाचे देयक संबंधित कंपन्याना अदा केले जाते.

(३) हे खरे नाही. सदर सात प्रकल्पांसाठी वितरीत केलेल्या रु. ३४७.७७ कोटी निधी पैकी २१५-५९ कोटी खर्च झाला असून प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) हे अंशत: खरे आहे.

(५) व (६) कामांमध्ये विलंब करणाऱ्या ठेकेदार कंपन्यावर निविदा अटी व शर्तीनुसार दंडात्मक कार्यवाही कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेली आहे.

---

## मुंबईतील सर्व नालेसफाईच्या कामांमध्ये कंत्राटदारांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१७) ३९४४५ (२१-०१-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या आपतकालीन परिस्थितील डेब्रीज व कचरा वाहून नेण्यासाठी महापालिकेकडून परिमंडळ निहाय कंत्राटदाराची निवड केली आहे दोन वर्षासाठी नियुक्त कंत्राटी कामासाठी दहा कोटी रुपये खर्च करण्यात येत आहे यात नालेसफाईच्या कंपनीला दोन परिमंडळामध्ये सव्वा तीन कोटीचे कंत्राट देण्यात आले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन संबंधित कंत्राटदार कंपनीचे कंत्राट रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६)** :(१) मुंबईत फक्त पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीत डेब्रीज वाहून नेण्याबाबतचे कंत्राट देण्यात येत नसून, वर्षभर मुंबईत महापालिकेच्या जागेवर जमा होणारे डेब्रीज वाहून नेण्यासाठी महापालिकेमार्फत परिमंडळनिहाय ई-निविदा मागवून कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात येते.

२४ विभागांतील डेब्रीज वाहून नेण्यासाठी ८ गट / परिमंडळ बनवून सन २०१४-१६ या दोन वर्षाकरिता एकूण रु. १८,४०,७५,४१३/- चे कंत्राट ८ कंत्राटदारांना देण्यात आलेले आहे. या ८ कंत्राटदारांपैकी मे. केबीए इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. व मे.हेमांग कन्ट्रक्शन या नालेसफाईच्या कंत्राटदारांना अनुक्रमे गट-२ मधील (एच/पश्चिम व के/पश्चिम विभाग) रु. १,७९,८२,८२०/- इतक्या रकमेचे व परिमंडळ-७ मधील (आर/दक्षिण, आर/मध्य व आर/उत्तर विभाग) येथील रु. २,४६,६१,१५०/- इतक्या रकमेचे डेब्रीज वाहून नेण्याच्या कामाचे कंत्राट देण्यात आले आहे.

(२) मे. केबीए इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. व मे.हेमांग कन्स्ट्रक्शन या कंत्राटदारांना डेब्रीज वाहून नेण्याचे काम. त्यांना नालेसफाईच्या कामाचे कंत्राट देण्यापूर्वीच देण्यात आलेले आहे. त्यामुळे या कामासाठी त्यांच्यावर कोर्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी येथे सिलिंडर स्फोटाने झोपडयांना लागलेली आग**

**(१८) ३९८९४ (१७-०५-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी येथील मिरकरवाडा जेटी परिसरात सिलिंडर स्फोटाने सुमारे १८ झोपडयांना आग लागल्याची घटना दिनांक ३० डिसेंबर २०१५ मध्ये वा त्या सुमारास घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास सदर पाहणीत काय आढळून आले व तद्‌नुसार सदर झोपडीधारकांचे पुनर्वसन अथवा नुकसानीची आर्थिक मदत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

दि. २७.१२.२०१५ रोजी रत्नागिरी येथील मिरकरवाडा बंदर व्यवस्थापन प्राधिकरण यांचे ताब्यातील जमिनीस अतिक्रमण करुन बांधलेल्या १६ कच्च्या झोडप्या आकस्मिकपणे लागलेल्या आगीमुळे जळलेल्या आहेत.

रत्नागिरी नगरपरिषदेस सदर घटना दुरध्वनीद्वारे सकाळी १०.४५ वा कळाल्यानंतर नगरपरिषदेच्या अग्निशमन पथकामार्फत सदर आग विझविण्यात आली.
(२) सदर जळीत १६ झोपड्याचे पंचनामे तससिलदार, रत्नागिरी यांचे मार्फत करण्यात आलेले आहेत.
(३) सदर झोपड्या मिरकरवाडा बंदर व्यवस्थापन प्राधिकरणाच्या जागेवर अनधिकृत असल्याने त्यांना कोणतेही अनुदान देण्यात आलेले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**इचलकरंजी नगरपालिकेने बनावट कागदपत्रांच्या आधारे**
**पाणीपट्टी दरात ५० टक्के वाढ केल्याबाबत**

**(१९) ४००३३ (१३-०५-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापुर जिल्ह्यातील इचलकरंजी नगरपालिकेने बनावट कागदपत्रांच्या आधारे पाणीपट्टी दरात ५० टक्के वाढ केल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणीपट्टी दरात वाढ करताना उपविधी न करता व शासनाची मंजुरी न घेता वारंवार पाणीपट्टी दरात वाढ करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर दरवाढीची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले व त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) व (२) नाही, हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबरनाथ, बदलापूर (जि.ठाणे) आणि पनवेल (जि.रायगड) या नव्या महापालिका निर्माण करण्याबाबत**

**(२०) ४०१५७ (०७-०५-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ व बदलापूर या पालिका एकत्र करण्याबाबतच्या एमएमआरडीएने राज्य सरकारच्या नगरविकास विभागाकडे सादर केलेल्या प्रस्तावास येथील नागरिकांनी विरोध दर्शविलेला असून बदलापूर महापालिकेची वेगळी स्थापना करावी यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे जानेवारी, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात तसेच वारंवार मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ३ लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या नगरपालिकांचे महानगरपालिकेत रुपांतर करता येते त्यामुळे अंबरनाथ, बदलापूर आणि पनवेल या नगरपालिकांची प्रत्येकी लोकसंख्या ५ लाखापेक्षा जास्त असल्याने अंबरनाथ, बदलापूर (जि.ठाणे) आणि पनवेल (जि.रायगड) या नव्या महानगरपालिका निर्माण कराव्यात याबाबतच्या एमएमआरडीएने पाठविलेल्या अहवालास मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच अंबरनाथ व बदलापूर शहरांच्या नियोजनबध्द विकास होण्यासाठी दोन्ही स्वतंत्र महापालिकांची निर्मित कारण्याबाबत लवकरात लवकर निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात आतापर्यंत शासनामार्फत कोणता पाठपूरावा केला वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) होय, अशा स्वरुपाचा एकत्रित महापालिका स्थापनेस विरोध करणारा ठरावही संबंधित नगरपालिकेंनी केला आहे.

(२) व (३) पनवेल महानगरपालिका स्थापनेची प्राथमिक उद्घोषणा दि.१६.०५.२०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईत झापेडपट्टयांमध्ये स्वच्छ भारत अभियानांतर्गत शौचालये बांधण्याबाबत**

**(२१) ४०५६३ (०४-०८-२०१५). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशभरात झोपडपट्ट्यांमध्ये आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे स्वच्छ भारत अभियानांतर्गत अनुदान देवून घरात शौचालये बांधण्यास परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेला केंद्र शासन व राज्य शासन अनुदान देणार आहे काय तसेच किती शौचालये बांधण्यात येणार आहेत,
(३) असल्यास, मुंबईच्या झोपडपट्यामधून तब्बल ६० लाख रहिवाशी असून सार्वजनिक शौचालयांचा वापर क्षमतेपेक्षा जास्त होत असल्याने सेफ्टीक टँक व झोपडपट्टयातील शौचालयांना मलवाहिन्या न जोडल्यामुळे स्फोटक स्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच मुंबईतील गल्ल्या व चिंचोळ्या जागामध्ये बांधलेल्या झोपड्यांची अवस्था व अंतर्गत मल:निस्सारण वाहिन्यांकरीता जागा नसणे तसेच मुख्य मल:निस्सारण वाहिनी पर्यंतचा खर्च व फक्त पाच हजार खर्चून शौचालय बांधणे ही बाब विचारात घेता झोपडपट्टीवासीयांकरीता हे शक्य होत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या योजनेबाबत नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण असल्याने ही योजना यशस्वी करण्यासाठी शासन काय कार्यवाही करणार आहे,
(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०९-२०१६) :**(१) केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी) च्या धर्तीवर राज्य स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजवणी सुरु आहे. या अभियानांतर्गत सन २०११ च्या जनगणनेनुसार उघड्यावर शौचास जाणाऱ्या कुटुंबांना वैयक्तीक घरगुती शौचालय बांधकामासाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते.
(२) या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र व राज्य शासनामार्फत अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते. या अभियानांतर्गत सन २०११ च्या जनगणनेनुसार उघड्यावर शौचास जाणाऱ्या राज्याच्या नागरी भागातील ८.३२ लक्ष कुटुंबाना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी अनुदान देण्यात येणार आहे.

(३) विकास नियोजन आराखड्यामध्ये अंतर्भूत विकसित रस्त्यांवर मलनि:सारण वाहिन्या टाकण्यासाठी किमान ६ मीटर रुंदीच्या पक्क्या रस्त्याची आवश्यकता असते. मुंबई शहरातील झोडपट्ट्यामधील बहुतांश रस्ते अरुंद व अतिक्रमित आहेत. या रस्त्यालगतची बांधकामे कच्च्या स्वरुपाची असतात. त्यामुळे अशा झोपडपट्ट्यामध्ये मलनि:सारण वाहिन्या टाकणे तांत्रिक दृष्ट्या शक्य होत नाही, हि वस्तुस्थिती आहे.

(४) मुंबई शहरातील झोपडपट्ट्यामध्ये घरगुती शौचालयासाठी पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने अशा झोपडपट्ट्यामध्ये आवश्यकतेनुसार सार्वजनिक व सामुदायीक शौचालय बांधण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. लाभार्थ्यांनी वैयक्तीक घरगुती शौचालयापासून मुख्य मुलनि:सारण वाहिनी पर्यंतचा खर्च करणे अपेक्षित नसून अंतर्गत सामायिक मलनि:सारण वाहिनीपर्यंतचा खर्च करावयाचा आहे. या अभियानांतर्गत मुंबई शहरातील लाभार्थी कुंटूबांना वैयक्तीक घरगुती शौचालय बांधकामासाठी केंद्र शासनामार्फत रुपये ४,००० व राज्य शासनामार्फत रु.१००० आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत रु. २००० असे एकूण रु. ७००० इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते.

(५) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सामाईक मलनि:सारण वाहिनी टाकण्यासाठी पुरेशी अर्थसंकल्पीय तरतुद करण्यात आली आहे. ज्या ठिकाणी घरगुती शौचालय बांधणे शक्य नाही अशा वस्त्यांमध्ये सामुदायिक शौचालये बांधण्यात येत आहेत. त्याच प्रमाणे अंतर्गत मलनि:सारण वाहिनीसाठी जागा उपलब्ध नसल्यास अशा ठिकाणी बायो टॉयलेट किंवा दोन पीट टॉयलेट तंत्रज्ञानावर वैयक्तिक शौचालये बांधण्याची परवानगी दिलेली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अंबरनाथ (जि.ठाणे) येथील नगरपरिषदचे छाया रुग्णालय शासनाकडे हस्तांतरीत करण्याबाबत

**(२२) ४०६६० (११-०५-२०१६). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील नगरपरिषदेचे छाया रुग्णालय शासनाकडे हस्तांतरीत करावे ही मागणी अनेक वर्षापासून होत आहे तसेच याबाबत मा. मंत्री,सार्वजनिक आरोग्य यांना माहे मार्च, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधिंनी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबरनाथ शहराची लोकसंख्या लाखोंच्या पटीत असून ७०% वस्ती ही गरीब कामगारांची व आदिवासींची आहे सदर रुग्णालयात अपुरा तंत्रज्ञ व कर्मचारी वर्ग असल्यामुळे आदिवासी गोरगरीबांचे खुप हाल होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) हे खरे आहे.

नगरपरिषदेचे छाया रुग्णालय शासनाकडे हस्तांतरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(२) व (३) नगरपरिषद रुग्णालया अपुरा तंत्रज्ञ व कर्मचारी वर्ग होता. परंतु सद्य:स्थितीत कंत्राटी पध्दतीने डॉक्टर व अन्य कर्मचाऱ्याच्या सेवा नगरपरिषदेने उपलब्ध करुन घेतल्या आहेत. त्यामुळे आदिवासी व गोरगरीबांचे खुप हाल होत आहे अशी वस्तुस्थिती नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिका हद्दीतील दिवा विभागातील डंपिंग ग्राउंडमुळे नागरिकांच्या आरोग्याला बाधा निर्माण होत असल्याबाबत**

**(२३) ४११९१ (१७-०५-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका हद्दीतील दिवा विभागातील डंपिंग ग्राउंडला लागून टाकण्यात आलेल्या केमिकलच्या ड्रमला आग लागून पसरलेल्या धुरामुळे दिवा व आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना श्वास गुदमरणे, उलट्या, डोळ्याला त्रास होणे यासारखे प्रकार दिनांक ०८ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिवा विभागामध्ये टाकण्यात येणाऱ्या कचऱ्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरून, नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असल्याने डंपिंग ग्राउंड हटविण्याची मागणी नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी ठाणे महानगरपालिकेने कोणती कार्यवही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०९-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) सदरची माहिती पुरक टिप्पणीमध्ये सविस्तर देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रंकाळा (जि.कोल्हापूर) पदपथ उद्यानाची झालेली दुरवस्था**

**(२४) ४१३८७ (१६-०५-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रंकाळा (जि.कोल्हापूर) येथील उद्यानातील पदपथाची प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे दुरवस्था झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उद्यानात मॉर्निंग वॉक घेणाऱ्या लोकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर उद्यानाच्या आजूबाजूचा परिसर, फुल झाडांचे वाफे सुकून गेले असून हिरवळ पूर्णपणे नाहीशी झाली आहे तसेच परिसरात दगड गोट्यांचे साम्राज्य पसरले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रंकाळा उद्यानातील पदपथाची दुरुस्ती व सुशोभीकरण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही. रंकाळा तलावाच्या पश्चिम बाजूकडील रंकाळा चौपाटी उद्यान व नवीन पदपथ उद्यानामध्ये मशीनरी लावून जलपर्णी काढल्यामुळे पदपथाचा काही अंशी भाग खराब झालेला होता. ते पूर्ववत करण्याचे काम महापालिकेमार्फत करण्यात आलेले आहे. तसेच पदपथाचा काही भाग झाडांची मुळे खोलवर गेल्याने खचलेला आहे. त्याबाबत सदर पदपथ दुरुस्ती करण्याची कार्यवाही महानगरपालिका कोल्हापूर यांच्याकडून करण्यात आलेली आहे.
(२) नाही, हे खरे नाही, रंकाळा तलावाच्या पश्चिमेकडील परताळा पुलाच्या अलिकडील संरक्षक भिंत ढासळल्यामुळे तेथील काही अंशी भाग दुरुस्त करण्यात आलेला आहे. तथापी सद्यस्थितीत सदर पदपथावरुन नागरीकांना मॉर्निंग वॉक करताना कोणतीही अडचण उद्भवत असल्याचे निदर्शनास आले नाही.
(३) हे खरे नाही, रंकाळा तलाव पदपथ उद्यान जवळील सोडगेट लगत उद्यानाकडील तलावा बाजूची संरक्षक भिंत व रंकाळा चौपाटी उद्यान (शालीनी पॅलेससमोरील) तलावाची तटबंदी महापालिकेमार्फत नवीन बांधण्यंचे काम युध्दपातळीवर तत्परतेने सुरु केले होते. त्यावेळी सदर भिंतीकरीता लागणारे दगड, वाळू, खंडी इ. मटेरियल आतमध्ये नेताना वाहनाने तसेच मालमटेरियल ठिकठिकाणी टाकलेने पदपथ उद्यानातील फुल झाडे हिरवळीची वाफेचा काही भाग खराब झालेला होता. सदर काम पुर्णत्वानंतर महापालिकेच्या उद्यान विभगामार्फत खराब झालेल्या भागामध्ये हिरवळ व फुल झाडे लावणेचे काम हाती घेणेत आलेले आहे. महापालिका तसेच सामाजिक संस्था व विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने तलावाची स्वच्छता अभियान राबविणेत आलेले असून त्यामध्ये संपूर्ण तलावाचा परिसर स्वच्छ केलेला असलेने दगडगोटे पसरलेचे निदर्शनास आलेले नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर शहरातील पार्किंगच्या वाढत्या समस्येबाबत

**(२५) ४१३९४ (१३-०५-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरात पार्किंगचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पे अँड पार्कच्या पद्धतीमुळे वाहनधारकांची सर्रास लुट होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर शहरात अनेक ठिकाणी पार्किंगसाठी मोकळ्या जागा आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास उक्त जागा पार्किंगसाठी विकसित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०९-२०१६)** :(१) कोल्हापूरात श्रीमहालक्ष्मी मंदीरात भेट देणाऱ्या भाविकांची संख्या विचारात घेऊन पार्किंगचा प्रश्न गंभीर होऊ नये म्हणून बहुमजली पार्किंग निर्माण करण्याचे कोल्हापूर महानगरपालिकेने योजिले आहे.

(२) हे खरे नाही.

कोल्हापूर महानगरपालिका व कोल्हापूर महानगरपालिका परिवहन उपक्रम यांचेमार्फत ५ ठिकाणी सध्या पे अँण्ड पर्किंग सुरु आहे. त्यापैकी चार ठिकाणी महापालिका कर्मचारी यांचेमार्फत पार्किंग फी वसुली सुरु आहे व महापालिका परिवहन विभागाकडून एक ठिकाणी ठेकेदारामार्फत वसुली सुरु आहे व सदर ठिकाणी वाहनधारकांची कोणतीही लूट होत असल्याचे निदर्शनास आले नाही.

(३) व (४) महानगरपालिकेने एकुण १३ ठिकाणे पार्किंगसाठी निश्चित केले आहेत. त्याशिवाय २ ठिकाणी बहुमजली पार्किंग व्यवस्था प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कल्याण डोंबिवली महापालिका हद्दीमध्ये गत सात वर्षात २५ हजार अनाधिकृत बांधकामे उभारण्यात आल्याबाबत

**(२६) ४१७३८ (१३-०५-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिका हद्दीमध्ये गत सात वर्षात २५ हजार अनाधिकृत बांधकामे उभारण्यात आल्याचे, माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व तद्दनुसार सदरची अनधिकृत बांधकामे निष्कासित करून या अनधिकृत बांधकामास पाठीशी घालणाऱ्या महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०९-२०१६)** :(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील बांधकामांवर कर निर्धारण करताना “अनधिकृत बांधाक मअसल्यास त्याविरुध्दच्या कारवाईस बाध न येता” असा शिक्का मारुन महानगरपालिकेकडून कर आकारणी करण्यात आली आहे. यामध्ये महानगरपालिकेच्या स्थापनेपूर्वीची बांधकामे, पूर्णत्वाचा दाखला नसलेल्या, इमारतींना

कर आकरणी न झालेल्या, पूर्वी अर्धवट कर आकरणी केलेल्या, तसेच जुन्या इमारतींच्या वापरात बदल झालेल्या मालमत्ता इत्यादींचा देखील समावेश आहे. त्यामुळे या सर्वच मालमत्ता अनधिकृत आहेत. अशी वस्तुस्थिती नाही.
(२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून अनधिकृत बांधकामांच्या विरोधात शासनाच्या धोरणानुसार नियमितरित्या कारवाई करण्यात येते. याबाबतच्या कर्तव्यात कसूर करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरोधात वेळोवेळी नियमानुसार कारवाई करण्यात येत असल्याचे आयुक्त कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील कुळगांव-बदलापूर नगरपालिका हद्दीत असलेल्या आदिवासी वस्त्या व पाड्यांमध्ये मुलभूत सुविधा मिळणेबाबत**

**(२७) ४१८४१ (०५-०५-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील कुळगांव- बदलापूर नगरपालिका हद्दीत असलेल्या आदिवासी वस्त्या व पाड्यांवर पिण्याचे शुध्द पाणी, वीज, रस्ते अशा अनेक नागरी सुविधासह विविध मागण्यासाठी आदिवासी नागरिकांनी दि. ४ जानेवारी, २०१६ रोजी बदलापूर पालिका कार्यालयावर मोर्चा काढलेला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील आदिवासी नागरीकांनी नगरपरिषद कार्यालयावर दि. ३१.१२.२०१५ रोजी मोर्चा काढलेला होता, हे खरे आहे.
(२) * नगरपरिषद हद्दीतील आदिवासी पाड्यांवर पिण्याच्या पाण्यासाठी नादुरुस्त बोअरवले / हापसी दुरुस्त करुन पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली आहे. सदर ठिकाणी बंद असलेले विजेचे दिवे चालू करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. ज्या घरांमध्ये वीज नाही. त्या ठिकाणी M.S.E.D.C. या प्राधिकरणास पुढील कार्यवाहीसाठी नगरपरिषदेने पत्र दिलेले आहे.
* आदिवासी पाड्यातील लोकांना नगरपरिषदेच्या रुग्णालयातील डॉक्टर व आरोग्य कर्मचारी यांचे मार्फत आरोग्य तपासणी सुरु केलेली आहे.
* सर्व आदिवासी कुटूंबाची घरे / झोपडी यांना नगरपरिषद कर आकारणी करण्यात प्रस्तावित केलेले आहे. तसेच आदिवासी पाड्यांवर शासनाच्या वैयक्तीक शौचालय योजने अंतर्गत शौचालये मंजूर करण्यात आलेली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील गोरेगाव-मुलुंड जोडरस्ता बांधकामाबाबत

**(२८) ४२०७८ (१७-०५-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेच्या महत्वाकांक्षी असलेला प्रकल्प गोरेगाव-मुलुंड हा जोडरस्ता होण्यासाठी प्रयत्न चालविला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून प्रस्तावित भुयारी मार्गाचे अंतिम स्वरुप निश्चित करण्याकरिता भूस्तर चाचणी व भूसर्वेक्षण करणे अत्यंत गरजेचे असून वन विभागाची परवानगी मिळविण्याकरिता, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक १०.०३.२०१६ रोजी मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांच्याकडे विहित नमुन्यामध्ये आवेदन सादर करण्यात आले आहे.

वन विभागाकडे सदर प्रस्ताव विचाराधीन असून आवश्यक ती मंजुरी प्राप्त झाल्यानंतर महापालिकेमार्फत याबाबतची पुढील कार्यवाही प्राधान्याने करण्यात येईल.

---

## पंढरपूर (जि.सोलापूर) नगरपालिकेचा बायोगॅस प्रकल्प सुरु करणेबाबत

**(२९) ४२१७८ (०५-०५-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) नगरपालिकेचा बायोगॅस प्रकल्प मागील दोन वर्षापासून बंद अवस्थेत असल्याचे माहे, जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदरील बायोगॅस प्रकल्प लवकरात लवकर सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०९-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

सदर बायोगॅस प्रकल्पाचा डोम लिकेज असल्याने बंद आहे.

(३) सदर डोम दुरुस्ती बाबत ई-निविदा मागविण्यात आली आहे. ई-निविदा मंजूर झाली असून दुरुस्तीची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंढरपूरात (जि.सोलापूर) येथे सुसज्ज नाटयगृह बांधण्याबाबत

**(३०) ४२१८५ (०५-०५-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूरात (जि.सोलापूर) येथे सुसज्ज नाटयगृह बांधून मिळणेबाबतची मागणी अ.भा.मराठी नाट्य परिषदेच्या पंढरपूर शाखेने शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंढरपूर येथे सुसज्य नाट्यगृह बांधण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) पंढरपूर नगरपरिषदेमार्फत सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचे शिफारसीने विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडे दि. ०७.०५.२०१६ रोजी सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील कांजूरमार्ग (पू) येथील आरोग्य केंद्राची झालेली दुरवस्था

**(३१) ४२३४९ (१७-०५-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांजूरमार्ग (पू) येथील आरोग्य केंद्राची दुरवस्था झाली असून तेथे दारुडे आणि गर्दुल्यांचा अड्डा झाला आहे या दुरावस्थेकडे पालिका प्रशासनाचे लक्ष नसल्याने रुग्णांचा आधार असलेले हे आरोग्य केंद्र निराधार झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरोग्य केंद्रात अत्याधुनिक सोयीसुविधा पुरविण्याबाबत तसेच दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) अशा आशयाची माहिती वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती.

(२) कांजूरमार्ग (पू.) येथीलआरोग्य केंद्रातर्फे नागरीकांना लसीकरण, प्रसुती पश्चात, कुटूंब नियोजन इ. सुविधा पुरविण्यात येतात.

महापालिकेच्या ठरावानुसार सार्वजनिक खाजगी प्रोत्साहन पकल्प अंतर्गत “वात्सल्य ट्रस्ट” या संस्थेने सदर आरोग्य केंद्राची इमारत निष्कासित करुन नवीन इमारतीचे बांधकाम करावयाचे आहे.

"वात्सल्य ट्रस्ट" तर्फे अनाथ मुलांना आश्रय देणे, दुर्बल घटाकतील महिलांसाठी, मुलीसाठी रुग्ण सहाय्यीका प्रशिक्षण वर्ग, मतिमंद, अपंग व अंधासाठी निष्णात तज्ञातर्फे इलाज यासारखे उपक्रम राबविलेजातात.

सदर इमारतीमध्ये महापालिकेच्या आरोग्य केंद्रासाठी जागा उपलब्ध करुनल देण्याबाबतचा करार करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दौड (ता.जि.पुणे) येथील नगरपरिषदेच्या वतीने शहरात व शहराच्या विस्तारीत परिसरात मिनी बस सुरु करणेबाबत**

**(३२) ४२६१२ (१७-०५-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौड (ता. जि.पुणे) येथील नगरपरिषदेच्या वतीने शहरात व शहराच्या विस्तारीत परिसरात नागरिकांच्या सोयीसाठी मिनी बस सुरु करण्याची लेखी मागणी सदर विभागातील नगरसेवकांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांच्याकडे केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दौड शहरात व शहराच्या विस्तारीत परिसरात शहरीकरण झपाट्याने वाढत असल्याने या परिसरात नागरिकांचे वास्तव्य दिवसेंदिवस वाढत असल्याने विविध ठिकाणच्या नागरिकांना रेल्वे स्टेशनमधून व इतर ठिकाणाहुन उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय व इतर ठिकाणी जाण्याकरिता इतर वाहने जादा भाडे आकारत असल्यामुळे प्रवाशांची आर्थिक कोंडी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.

याबाबतचे निवेदन प्राप्त झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) नगरपालिने यापूर्वी महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ, दौड आगार प्रमुखांबरोबर चर्चा करुन रेल्वे स्टेशन पासून बससेवा सुरु करण्यात आली होती.

शहरामध्ये बससेवा सुरु केल्यानंतर नागरीकांच्या पुरेसा प्रतिसाद न लागल्याने सदरची बससेवा बंद करण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत जुन्या बसस्टॅड पर्यंत महामंडळाची बससेवा सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकाअंतर्गत सर्व शाळा इमारतींची स्वच्छता, सुरक्षा आणि शाळांमधील विद्युत साधने व उपकरणे बदलण्यासाठी पुन्हा नव्याने मागवलेल्या निविदांबाबत**

**(३३) ४३३९४ (०७-०५-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकाअंतर्गत सर्व शाळा इमारतींची स्वच्छता, सुरक्षा आणि शाळांमधील विद्युत साधने व उपकरणे बदलण्यासाठी पुन्हा नव्याने मागवलेल्या निविदांमध्येही कंत्राटदारांचे संगनमत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर निविदा प्रक्रिया रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबईतील भूखंडाचा अटी व शर्तीचा भंग करुन गैरवापर करणाऱ्या संस्थांना नोटीस बजावल्याबाबत**

**(३४) ४४२२७ (१७-०५-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील सिडकोने, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि वैद्यकीय वापरासाठी दिलेला भूखंडाचा, अटी व शर्तीचा भंग करुन, गैरवापर करीत असलेल्या संस्थांना दिनांक २२ जानेवारी, २०१६ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडकोने सामाजिक वापरासाठी दिलेल्या भूखंडापैकी किती व कोणत्या संस्थांनी गैरवापर केल्याचे आढळून आले आहे त्यापैकी किती संस्थांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे,

(३) असल्यास, भूखंडाचा गैरवापर करणाऱ्या संस्थांकडून, भूखंडाची मान्यता रद्द करणे व भूखंड ताब्यात घेणे बाबत शासन तथा सिडकोतर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०९-२०१६) :**(१), (२) व (३) होय, नवी मुंबईतील साधारणपणे २१ संस्थांनी भाडेपट्टा करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केल्याने सिडको महामंडळातर्फे कारणे दाखवा नोटीस बजावल्या आहेत.

सिडकोने वरील २१ संस्थांपैकी (अ) जागृती महिला मंडळ (भूखंड क्र.२, सेक्टर-४८ ए, नेरुळ), (ब) मे.ओरिएंटल एज्युकेशन सोसायटी (भूखंड क्र.१८९, सेक्टर-१२, वाशी) (क) नवी मुंबई महानगरपालिका (भूखंड क्र. २८, सेक्टर-१०ए, वाशी) या संस्थांना कारणे दाखवा नोटीसा बजावून त्यांच्यासोबत निष्पादित करण्यात आलेला करारनामा संपुष्टात आणून भूखंड वाटप रद्द केलेले आहेत. उर्वरित प्रकरणामध्ये संबंधित संस्थांनी दिलेला खुलासा तपासणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भाईंदर पूर्व येथील औद्योगिक वसाहतीतील अनधिकृत बांधकामाबाबत**

**(३५) ४४६८२ (०७-०५-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाईंदर पूर्व येथील गोडदेव फाटक परिसरातील सीता विहार इमारतीतील गायत्री इस्टेट ए या औद्योगिक वसाहतीतील गाळा क्र.५ मध्ये श्री.मिश्रा या मालकाने उभारलेल्या स्टीलच्या कारखाना महानगरपालिकेने १३ वर्षांनंतर सदर बांधकाम आरक्षित जागेवर झाल्याचे कारण देऊन निष्कासित केल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेवर सुमारे २० ते २५ कारखाने सुरु असतानाही पालिकेने मोजक्याच कारखान्यांवर कारवाई करुन कारखाना मालक व इतर कामगार यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू प्रकरणांबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मिरा-भाईंदर महानगरपालिका विकास योजनेतील भुमापन क्र.७५/पै (जुना) ही जागा आरक्षण क्र. ११९ “खेळाचे मैदान” या प्रयोजनाकरीता आरक्षित आहे. सदर जागेवरील २७ गाळ्यांचे अनधिकृत बांधकाम काढून टाकण्याबाबत महानगरपालिकेकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार नोटीस देण्यात आली.

या गाळ्यांपैकी गाळा क्र. ५, ९, १० व ११ रमाबाई इस्टेट-बी आणि गाळा क्र १, ३, ६, १८ व १९ गायत्री इस्टेट-बी या गाळ्यांच्या गाळेधारकांनी प्रकरण न्यायप्रविष्ट केल्याने उर्वरित गाळ्यांवर महानेरपालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून कारवाई करण्यात आली आहे. तसेच गायत्री इस्टेट-ए मधील एकूण ९ गाळ्यांपैकी गाळा क्र.४, ५ व ६ हे गाळे आरक्षणाने बाधीत होत असल्याने त्यांच्यावर महानगरपालिकेकडून कारवाई करण्यात आली आहे.

सदर जागेवरील आरक्षणाने बाधित जागेचे मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून सर्वेक्षण केल्यानंतरच पुढील कारवाई करण्यात आली आहे. आरक्षणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी असलेल्या गाळे/कारखाने यांच्यावर महानगरपालिकेकडून कारवाई करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विटा (जि.सांगली) येथील शहरातील ओढ्यावर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाल्याबाबत**

**(३६) ४५३३८ (०५-०५-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विटा (जि.सांगली) येथील शहरातील ओढ्यावर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिक्रमित जागेवर नगरपरिषद विटा यांनी नळ, वीज तसेच इतर सोई उपलब्ध करुन अतिक्रमणास खतपाणी घातले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अतिक्रमण हटविण्यासाठी कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व ही अतिक्रमणे केव्हा हटविण्यात येणार आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.

तथापि, खानापूर रस्ता ओढ्याच्या ठिकाणी ६ पत्र्याचे गाळे आहेत. नगरपरिषदेने सदर गाळे काढून टाकणेबाबत नोटीस बजावलेल्या आहेत.

(४) ओढापात्राची मोजणीसाठी तालुका निरीक्षक भुमी अभिलेख, खानापूर विटा यांचेकडे पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. नियमानुसार ओढा क्षेत्रातील अतिक्रमणे काढून टाकण्याची कार्यवाही चालू आहे.

---

**कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील कल्याण पूर्वेला नवीन**
**शिधा वाटप कार्यालयासाठी जागा मिळणेबाबत**

**(३७) ४५६२७ (०५-०५-२०१६). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील कल्याण पूर्वेला नवीन शिधा वाटप कार्यालय मंजूर झाले असून जागा उपलब्ध करुन देण्याबाबतचे निवेदन आयुक्त, कल्याण-डोंबिवली महापालिका यांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वारंवार निवेदने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०९-२०१६) :**(१) होय. हे खरे आहे.

(२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सेक्टर क्र.१ ते ७ च्या मंजूर विकास योजनेत शिधा वाटप कार्यालयाकरीता कोणतेही आरक्षण प्रस्तावित नाही. मात्र महानगरपालिकेच्या ताब्यातील किंवा शासनाच्या कार्यालयाकरीता प्रस्तावित असलेल्या आरक्षणांपैकी पालिकेच्या ताब्यातील इतर प्रयोजनाकरीता असलेली जागा उपलब्ध करुन देणे शक्य असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

तथापि उप सहनियंत्रक, शिधा वाटप, ठाणे यांच्याकडून तसा प्रस्ताव महानगरपालिकेस अद्याप प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कुळगांव बदलापूर नगरपालिका क्षेत्रातील शहरी गरिबांसाठी बांधण्यात आलेल्या बीएसयुपी योजनांच्या इमारतींबाबत

**(३८) ४५७२५ (१६-०५-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कुळगांव बदलापूर नगरपालिका क्षेत्रातील शहरी गरिबांसाठी बांधण्यात आलेल्या बी एस यु पी योजनांच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून लाभार्थ्यांना त्याचा ताबा देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदशर्नास आले तद्नुसार बीएसयुपी घरांचा ताबा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी हरकती / सूचना मागविण्यासाठी प्रसिध्दी दिली असून लाभार्थ्यांची अंतिम निवड करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(२) व (३) याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई यांचेकडून चौकशीची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अंबरनाथ नगरपालिका क्षेत्रातील बीएसयुपी योजनेबाबत

**(३९) ४५७४१ (०६-०५-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ नगरपालिका (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) क्षेत्रातील बीएसयुपी योजनेचे काम अत्यंत संथगतीने व निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे त्याचा लाभार्थ्यांना लाभ मिळत नसल्याने तसेच हि

योजना रखडल्याने माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदशर्नास आले तद् नुसार बीएसयुपी योजनेतील निकृष्ट दर्जाची घरे बांधणाऱ्या ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे. तसेच रखडलेली योजना तत्काळ कार्यान्वित होण्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) अंबरनाथ नगरपरिषदे क्षेत्रामध्ये बी.एस.यु.पी. योजनेचे काम सुरुच झालेले नसल्याने निकृष्ट दर्जाचे काम होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### कोल्हापुर येथील रंकाळा तलावाचे सुशोभिकरणाबाबत

**(४०) ४६७१६ (१७-०५-२०१६). श्री.प्रकाश अबिटकर (राधानगरी), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूरातील रंकाळयाच्या पाण्याला दर तीन महिन्यांनी येणारी दुर्गंधी, संरक्षक कठडयाची पडझड,बगीच्यासह पायाभूत सुविधांकडे केलेले दुर्लक्ष, पार्किंगसह वाहतूक, व्यवस्था कोलमडली तसेच नैसर्गिक पुनर्भरण बंद होत असल्याने रंकाळयाची दुरवस्था दिवसेंदिवस वाढत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापुर येथील रंकाळा तलावाचे सुशोभिकरण करण्यासाठी महानगरपालिकेने १२५ कोटी रुपयांचा प्रकल्प विकास आराखडा तयार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर महानगरपालिकेने रंकाळा तलावासाठी आजतागायत खर्च केलेल्या ८ कोटी ६६ लाख व नव्याने सादर केलेला १२५ कोटींचा प्रकल्प आराखाडयाला पर्यावरणवादी कार्यकर्त्यांकडून आक्षेप धेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.

रंकाळा तलावाकडे येणारे कोणतेही नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत बंद केलेले नाही. प्रत्येक वर्षी पाऊसाने तलाव पूर्णपणे भरतो व त्याचे नैसर्गिक पुनर्भरण होते. तलावात मिसळणारे नाले व अडवुन वळविणे, जलपर्णी काढणे, तटबंदी पूर्ववत करणे यासारखी कामे वेळोवेळी केली जातात.

(२) होय, हे खरे आहे.

पर्यावरणी व हेरीटेज संवर्धन विषयक कामांचा रु.१३१ कोटींचा एकत्रीत आराखडा तयार केला आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदरच्या अर्जावरील सुनावणी मा.राष्ट्रीय हरित लवाद येथे सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण डोबिवली महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या २७ गावांसाठी स्वतंत्र नगरपालिका करण्याबाबत**

**(४१) ४६८९३ (०३-०५-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या २७ गावांच्या मूलभूत सोयीसुविधा पुरविण्यासाठी महानगरपालिकेकडे निधी उपलब्ध नसल्याने २७ गावांसाठी स्वतंत्र नगरपालिका करावी अशी मागणी सर्वपक्षीय हक्क संरक्षण संघर्ष समितीने शासनाकडे केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रकरणाची शासनाने दखल घेऊन कल्याण-डोंबिवलीतील २७ गावांसाठी स्वतंत्र नगरपालिका करण्याबाबत शासनाने आपली भुमिका स्पष्ट करुन त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) शासन अधिसूचना दि.०७/०९/२०१५ अन्वये राज्य शासनाने कल्याण-डोंबिवली शहर महानगरपालिका क्षेत्राच्या सीमांत फेरफार करण्याचा आणि उक्त महानगरपालिकेच्या बृहत नागरी क्षेत्रातून वगळावयाच्या २७ गावांकरीता नगरपालिका घटीत करण्याचा इरादा जाहीर केला असून त्यानुषंगाने संबंधित व्यक्तींकडून प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांसंदर्भात संबंधितांची सुनावणी घेण्याकरीता विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील तिर्थक्षेत्र देवाची आळंदी येथे ज्ञानेश्वर मंदिर परिसरातील संदीप कायस्थ यांचे वडिलोपार्जित हॉटेल व दुकानाबाबत**

**(४२) ४९६९८ (१७-०५-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील तिर्थक्षेत्र देवाची आळंदी येथे ज्ञानेश्वर मंदिर परिसरातील संदीप कायस्थ यांच्या आजोबांच्या वडिलोपार्जित आळंदी नगरपालिका भाडेकरू मिळकत क्र.६३ मधील हॉटेल

व प्रसादाच्या दुकानाचा नगरपालिका मुख्याधिकारी यांनी मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाचा भंग करून गत तीन वर्षापासून ताबा घेतला असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वहिवाटदारास मार्च, २०१६ पर्यंत दुकान व हॉटेल बंद असतानाही तीन वर्षाच्या थकबाकीसह संकलित कर भरण्यास नगरपालिकाकडून सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गेली तीन वर्षे दुकान व हॉटेल बंद असल्याने सदर वहिवाटदारास आर्थिक स्थिती खालावल्याने त्यांना तीन वर्षाची नुकसानभरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१), (२) व (३) या प्रकरणी जिल्हाधिकारी, पुणे यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्यास सुचित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## प्रमोद महाजन यांच्या स्मृतीप्रित्यार्थ उभारण्यात आलेल्या कला पार्कची दुरवस्था झाल्याबाबत

**(४३) ५०६४८ (०३-०५-२०१६). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दादर मधील मोक्याच्या विस्तीर्ण जागेत प्रमोद महाजन यांच्या स्मृतीप्रित्यर्थ उभारण्यात आलेल्या कला पार्कची दुरवस्था झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कला पार्कची दुरवस्था दूर करण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मलनि:सारण प्रचालन खात्यामार्फत सेपापती बापट मार्ग, दादर येथील मलनि:सारण प्रक्रिया केंद्राच्या विस्तीर्ण जागेवर प्रमोद महाजन कला पार्क या उद्यानाची निर्मिती करण्यात आली आहे.

माहे जानेवारी, २०१५ मध्ये सदर उद्यानाच्या परिक्षणासाठी कंत्राटदार उपलब्ध नसल्यामुळे उद्यानातील हिरवळ व शोभिवंत झाडांचे काही प्रमाणात नुकसान झाले होते.

सदर उद्यान परिरक्षणाकरिता माहे एप्रिल, २०१५ मध्ये महापालिकेच्या उद्यान खात्याकडे हस्तांतरीत केल्यानंतर उद्यान खात्यामार्फत ४२ महिन्यांच्या कालावधीकरिता कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत सदर उद्यान सुस्थितीत आहे.

(२) सदर उद्यानाच्या देखभालीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात आवश्यक निधीची तरतूद करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### लोणावळा (ता.मावळ, जि.पुणे) येथे वाहनतळासाठी आरक्षित जागेवर वाहनतळ बांधकाम होणेबाबत

**(४४) ५२५३६ (१७-०५-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा - मावळ तालुक्यातील पर्यटननगरी लोणावळा शहराच्या नगरपरिषद स्थापनेला १३९ वर्ष होऊनही शहरात कोठेही वाहनतळ व्यवस्था न झाल्याने येथील वाहतूककोंडी व वाहनतळांची समस्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यभरासह देश विदेशातील पर्यटक लाखोंच्या संख्येने शहरात येतात. त्यातच वाढत्या नागरीकरणामुळे शहराची लोकसंख्या व वाहनाची संख्या झपाट्याने वाढली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाहनतळांची सोय करता येऊ शकेल अशा मोक्याच्या जागा शहरात आहेत अनेक वेळा नगर परिषद व पोलीस प्रशासनाच्या वतीने या जागांची पाहणी करण्यात आली मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणी न झाल्याने पार्किंगची मोठ्या प्रमाणावर अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, लोणावळा येथे वाहनतळ होणे बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) नगरपरिषदेने सुधारित मंजूर विकास योजनेमध्ये कार पार्क / वाहनतळ यासाठी एकूण विविध ठिकाणी ०८ आरक्षणे प्रस्तावित असून निधीच्या उपलब्धतेनुसार वाहनतळ उभारण्याचे प्रस्तावित आहे. याशिवाय शहर व परिसरामध्ये शहर पोलिसांच्या सहकार्याने ठिकठिकाणी पार्किंगेची व्यवस्था केलेली आहे. तसे फलकही लावले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे शहरातील मोबाईल टॉवर्स जागा मालकाकडे तीनशे कोटींची थकबाकी असल्याबाबत

**(४५) ५९२५० (२६-०८-२०१६). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील १८०० मोबाईल टॉवर्स जागा मालकाकडून महापालिकेला तिनशे कोटी थकबाकी येणे आहे असे माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, थकबाकी थकवलेल्या टॉवर्स मालकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०९-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) थकबाकी व चालु मागणी सहीत मिळकत कर भरणेबाबत माहे एप्रिल, २०१६ मध्ये देयक पाठविण्यात आले.

त्यानंतर ज्या मिळकतींवर मोबाईल टॉवर्स उभे आहेत त्या मिळकतीचे जागा मालकास कर भरणेबाबत पुणे महानगरपालिकेमार्फत जागा मालकास कर भरणेबाबत पुणे महानगरपालिकेमार्फत नोटीस देण्यात आली आहे.

माहे मे, २०१३ ते मे, २०१६ या कालावधीत कर आकारणी न झालेल्या मोबाईल टॉवरची कर आकारणी करणे व करसंकलन करणेसाठी बाहेरील एजन्सीची नेमणुक केली असून, त्यांचे मार्फत कर आकारणीची व कर संकलनाची कार्यवाही पुणे महानगरपालिकेने केली आहे.

---

**पुणे महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयाकडून स्टीलचे खांब आणि बेंचेसची खरेदी जास्त दराने केल्याबाबत**

**(४६) ६०८८३ (२६-०८-२०१६). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयांकडून बसविण्यात येत असलेले स्टीलचे खांब आणि बेंचेसची खरेदी बाजारभावापेक्षा जास्त दराने केली जात असल्याची बाब माहे, जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्टील खांबांची बाजारातील किंमत बाराशे ते पंधराशे रुपये असताना, त्यासाठी प्रशासनाने सहा ते साडेसात हजार रुपये या दराने निविदा मागविल्या असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०९-२०१६)** :(१) व (२) हे खरे नाही.

महानगरपालिकेच्या शेड्युलमान्य पत्रकानुसार स्टीलचे खांब स्टील बेंचेससाठी पुर्वगणनपत्रक तयार करण्यात आलेले आहे व त्यानंतर सर्वात कमी दराने निविदा सादर केलेल्या ठेकेदाराकडून सदरची कामे करुन घेण्यात आलेली आहेत. पुणे महानगरपालिकेने शेड्युलमान्य दराने निविदा मागविणेत आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे शहरातील पाणी टंचाईच्या काळात बेकायदा नळजोडण्या दिल्याबाबत

**(४७) ६१३५१ (२९-०८-२०१६). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यात बेकायदा नळजोडणी मोठ्या प्रमाणात आहेत तसेच पाणीटंचाईच्या काळात त्यात वाढ होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनधिकृत नळजोडणी घेतलेल्या सोसायट्यांमध्ये महापालिकेचे कायदेशीर नळजोड आणि बेकायदा नळजोड असल्यामुळे पाण्याचा मुबलक पुरवठा होतो, तर त्याच भागातील इतर सोसायट्यांमध्ये केवळ कायदेशीर नळजोडण्या असल्याने पाणीटंचाईला सामोरे जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०९-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

पाणी टंचाई परिस्थिती मध्ये एखाद्या मिळकतीस पाणी पुवठा कमी पडत असल्यास बेकायदेशीर नळजोड घेण्याचा प्रयत्न करण्यात येतो. आतापर्यंत पुणे महानगरपालिकेमार्फत सुमारे १३१५ अनधिकृत नळजोडणीवर कारवाई केली आहे.

(२) हे खरे नाही.

अशी बाब पुणे महानगरपालिकेच्या अद्याप निदर्शनास आली नाही. त्यामुळे हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील महानगरपालिकेच्या घंटागाडी कर्मचाऱ्यांना सुधारीत किमान वेतन लागू न करण्यात आल्याबाबत

**(४८) ६२१९१ (२९-०८-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महानगरपालिकेच्या घंटागाडी कर्मचाऱ्यांना सुधारीत किमान वेतन लागू करण्यात न आल्याने त्यांचे वेतन रखडले असुन त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे यामुळे या कर्मचाऱ्यांनी महानगरपालिका प्रवेशद्वारावरच आंदोलन केले असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांना वेतन मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०९-२०१६)** :(१) हे खरे नाही.

(२) शासन अधिसूचना उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, दि.२४.०२.२०१५ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत वगळून) या अनुसूचित रोजगारातील कामगारांना पुनर्निधारीत केलेल्या किमान वेतन दराची अंमलबजावणी करण्याबाबत शासन परिपत्रक, नगर विकास विभाग, दि.२२.०१.२०१६ अन्वये सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भाईंदर महापालिकेच्या कामगारांना लागु करण्यात आलेले किमान वेतन देणेबाबत**

**(४९) ६२७३६ (२२-०७-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागातील सुमारे १९० कंत्राटी कामगारांना लागु करण्यात आलेल्या किमान वेतनाच्या ४५ लाख रूपयापैकी कंत्राटदाराने केवळ २७ लाख कामगारांना दिले असून उर्वरीत रक्कम देण्यास कंत्राटदार टाळाटाळ करीत असल्याबाबत श्रमजीवी रयत कामगार संघटनेने कंत्राटदाराच्या विरोधात मिरा-भाईंदर आयुक्तांकडे तक्रार दाखल करून वेतनाचा अपहार केल्याबाबत गुन्हा दाखल करण्याची मागणी दिनांक १५ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या कामगारांनी काम सोडले आहे व त्यांना पालिकेने कामावरून काढले आहे, अशा सर्व कामगारांना कंत्राटदाराकडुन वेतनातील फरक मिळवुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे,

(२) व (३) माहे जून, २०१२ ते माहे मे, २०१४ या कालावधीत किमान वेतन कायद्यानुसार कामगारांना देय असलेली थकीत फरकाची रु.४५,१६,५४०/- इतकी रक्कम संबंधित ठेकेदारास मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून अदा करण्यात आली आहे.

या कालावधीत ज्या कामगारांनी काम सोडले आहे व ज्यांना पालिकेकडून कामावरुन काढण्यात आले आहे, अशा सर्व कामगारांना किमान वेतनानुसार येणारी फरकाची रक्कम त्यांच्या हजेरीनुसार अदा करण्याच्या सूचना महानगरपालिकेकडून संबंधित कंत्राटदारास देण्यात आल्या. या अनुषंगाने कामगारांना अदा केलेल्या फरकाच्या रकमेचा तपशील, तसेच कामगारांची यादी व बँक विवरणपत्र सादर करण्याबाबत महानगरपालिकेच्या उद्यान विभागाकडून दि.०१/०६/२०१६ च्या पत्रान्वये संबंधित कंत्राटदारास कळविण्यात आले.

संबंधित ठेकेदाराकडून उक्त कामगारांच्या देय रकमा १५ दिवसांच्या आत अदा न करण्यात आल्यास, त्या ठेकेदाराचा ठेका रद्द करुन त्यास काळ्या यादीत टाकण्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

---

**शिव इन्स्टीट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड टेक्नॉलॉजी या नावाखाली अनधिकृत प्रशिक्षण संस्था सुरु करुन फसवणूक केल्याबाबत**

**(५०) ६४२७७ (२२-०७-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (ता.जि.हिंगोली) येथे काही दिवसांपुर्वी शिव इन्स्टीट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड टेक्नॉलॉजी या नावाखाली अनधिकृत प्रशिक्षण संस्था सुरु करुन प्रशिक्षणार्थी महिला व मुलींकडून ब्युटीपार्लर, ड्रेस डिझायनिंग व संगणक प्रशिक्षण देण्याच्या नावाखाली ६०० ते १५०० रुपये शुल्क आकारुन प्रशिक्षणार्थींची फसवणूक केली असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी करुन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (३०-०७-२०१६) :**(१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.